# SHIKSHA CLASSES

**विषय : मराठी (E.M.)** | **एकूण गुण : ८०**
**इयत्ता : १० वी** | **Prelim Question Paper - 2** | **वेळ: ३ तास**

**प्र. १ अ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनानुसार कृती करा.** **७**

''खरयं पोरांनो, आजकाल चालणं, सायकल वापरणं विसरूनच गेलोय आपण. अगदी कोपऱ्यावरून भाजी जरी आणायची असली तरी आपण बाईकला किक मारतो आणि पुन्हा व्यायामाकरिता वेगळं मॉर्निंग वॉकचं नाटक करतो. बसनं प्रवास करणं तर आपल्याला कमीपणाचं वाटतं, पण आपल्या पायांना चिकटलेला कार्बन प्रमाणात ठेवण्याकरीता पब्लिक ट्रान्सपोर्ट इज द मस्ट'' अभिषेकचे बाबा म्हणाले.


रेखा मावशी सगळ्यांचं बोलणं लक्ष देऊन ऐकत होत्या. बोलता बोलता हलकेच त्यांनी आपल्या पायाचे फरशीवरचे ठसे ओल्या फडक्याने फुसून घेतले.


''पाह्यलंत, किती सहजपणे पुसले आपल्या मळलेल्या पायांचे ठसे रेखामावशींनी,'' सुमित म्हणाला.

''पण आपल्या पायांचे वातावरणावर उमटलेले ठसे मात्र, आपल्याला इतक्या सहजतेने नाही बरं पुसता येणार. त्या करता आपल्याला झाडं लावावी लागतील... या हिरव्यागर्द झाडांनी आपली काळीकुट्ट पावलं थोडी तरी उजळ होतील,'' सुमित भरभरून बोलत होता. ''हो ना, नाही तर आपण तसेच धावत राहू. मळलेल्या पायांची माणसं बनून!'' पावडेकाका बोलले आणि त्या निळ्याशार तुकड्यावर चांदणं उमलल्याचा त्यांना भास झाला.

**I) आकलन कृती :**

**आकृत्या पूर्ण करा.**

i) 
 **१**

ii) 
 **१**

SHIKSHA CLASSES, BHANDARA

**II) आकलन कृती :**

**i) योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.** १

पायांचे वातावरणात उमटलेले ठसे पुसण्यासाठी .............

१) खाजगी वाहने वापरावीत.

२) झाडे लावावी लागेल.

३) पेट्रोल जाळावे लागेल.

४) फूटप्रिन्टस् ॲप वापरावे लागेल.

**ii) आकृती पूर्ण करा.** १

आपले परस्परविरोधी गैर वागणे → [ ]
आपले परस्परविरोधी गैर वागणे → [ ]

**III) स्वमत :**

आपल्या पायांचे वातावरणात उमटलेले ठसे, आपल्याला सहजतेने पुसता येणार नाहीत, या विधानाचा तुम्हाला कळलेला अर्थ स्पष्ट करा. ३

**आ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.**

एकदा मी पु.ल. देशपांडे यांच्याकडे काही एक निमित्ताने गेलो होतो. काम झाल्यावर मी निघण्याच्या बेतात होतो; तेवढ्यात सुनीताबाईंनी मला थांबवले व विचारले, ''तुम्हाला शाल दिली तर चालेल का?''

मी एका पायावर 'हो' म्हटले. पु. ल. व सुनीताबाई यांनी शाल द्यावी, हा मला मोठा गौरव वाटला. ती शाल मी माझ्या खोलीतल्या सुटकेसमध्ये ठेवून दिली. वापरली मात्र कधीच नाही.

पुढे वाईला विश्वकोशाचा अध्यक्ष म्हणून मी गेलो. तिथे नदीकाठच्या प्राज्ञ पाठशाळेच्या खोलीत मी राहत असे. खोलीच्या दक्षिणेकडील खिडक्या कृष्ण नदीच्या चिंचोळ्या प्रवाहावर होत्या. थंडीच्या दिवसात एक बाई माझ्य खिडकीखालील घाटाच्या छोट्या तटावर तिचे छोटे मूल एका टोपलीत ठेवून मासे पकडण्याच्या उद्योगात होती. तिचे बाळ कडाक्याच्या थंडीने कुडकुडत रडत होते; पण आई तिकडे बघतही नव्हती. मला मात्र राहवले नाही. मी सुटकेसमधील 'पुलकित' शाल काढली, पाचपन्नास रूपयांच्या नोटा काढल्या व त्या बाईला हाक मारली. खिडकीतून ते सर्व खाली दिले आणि म्हटले, ''त्या बाळाला आधी शालीत गुंडाळ आणि मग मासे मारत बैस.'' या घटनेची ऊब पुलकित शालीच्या उबेपेक्षा अधिक होती.

कविवर्य नारायण सुर्वे खूप सभा, संमेलने गाजवत. पुढे ते साहित्य संमेलनाचे अध्यक्षही झाले. परिणामत: त्यांच्या कार्यक्रमांना अहोरात्र भरतीच असे. प्रत्येक कार्यक्रमात सन्मानाची शाल व श्रीफळ त्यांना मिळत राही. एकदा ते मला म्हणाले, ''या शाली घेऊन घेऊन मी आता 'शालीन' बनू लागलो आहे.''

**I) कोण ते लिहा.** २

i) सभा, संमेलन गाजवणारे कवी - ------

ii) विश्वकोशाचे अध्यक्ष या नात्याने वाईला जाणारे - ------

iii) लेखकाचा शाल देऊन गौरव करणारे - ------

vi) मासे पकडण्याचा उद्योग करणारी - ------

SHIKSHA CLASSES, BHANDARA

**II) का ते लिहा.** २

i) बाळ रडत होते, कारण...

ii) लेखकाने सुटकेसमधील 'पुलकित' शाल काढली, कारण...

**III) स्वमत :**

'शाल व शालीनता' यांचा पाठाच्या आधारे तुम्हाला कळलेला अर्थ स्पष्ट करा. ३

**इ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** ४

> महात्मा गांधीजींनी भारतीयांना हाक दिली. 'चला खेड्याकडे!' महात्माजींनी राजकारणात प्रवेश करण्यापूर्वी आपल्या राजकीय गुरुंच्या गोपाळ कृष्ण गोखले यांच्या, सांगण्यानुसार १९१६ साली संपूर्ण भारताची यात्रा केली होती. त्यामुळे त्या महात्म्याला हा देश पूर्णपणे समजून घेता आला. भारत हा खेड्यांचा देश आहे. खेडी सुधारली तरच देशाच विकास होईल हे त्यांनी जाणले होते. म्हणून त्यांनी युवकपिढीला आवाहन केले, ''चला खेड्याकडे!''
>
> बापूंच्या सांगण्याकडे कुणी गांभिर्याने पाहिले नाही. त्याचे विपरित परिणाम आज दिसत आहे. खेडी ओस पडली आहेत आणि शहरे मात्र वेडीवाकडी फुगत चालली आहेत. निसर्गाचा समतोल बिघडला आहे. प्रदूषणाच्या समस्या सतत ग्रासत आहेत. खेड्यांकडून शहरांकडे वळणारा हा माणसांचा लोंढा आपल्याला थोपवता येणार नाही का? माणसे शहराकडे भाकरीसाठी, उद्योगधंद्यासाठी येतात. खेड्यात करण्यासारखे काही उद्योग राहिले नाहीत; म्हणून ही माणसे शहराकडे धावतात. ओली - कोरडी भाकरी मिळवतात. त्यासाठी कुठेतरी घाणीत, झोपडपट्टीत राहतात. परिणामतः ते क्षयासारख्या एखाद्या भयंकर आजाराचे भक्ष्य होतात.

**I) आकलन कृती :**

**i) चौकटी पूर्ण करा.** १

१) खेड्याकडे चला संदेश देणारे → ☐

२) महात्मा गांधीजींचे राजकीय गुरु → ☐

**ii) आकृती पूर्ण करा.** १

शहरीकरणाचे परिणाम
- → खेडे → ☐
- → शहर → ☐

**III) स्वमत :**

**शहरीकरणाचे दुष्परिणाम तुमच्या शब्दांत लिहा.** २


SHIKSHA CLASSES, BHANDARA

**प्र. २ अ) खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दुःखात गेले.
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे
शेकडो वेळा चंद्र आला; तारे फुलले, रात्र धुंद झाली;
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.
हे हात माझे सर्वस्व; दारिद्र्याकडे गहाणच राहिले
कधी माना उंचवलेले, कधी कलम झालेले पाहिले
हरघडी अश्रू वाळविले नाहीत; पण असेही क्षण आले
तेव्हा अश्रूच मित्र होऊन साहाय्यास धावून आले.
दुनियेचा विचार हरघडी केला, अगा जगभय झालो
दुःख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकलो
झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दुःखात गेले.

**I) आकलन कृती :**

**i) आकृती पूर्ण करा.** १




**ii) खालील शब्दसमूहाचा तुम्हाला कळलेला अर्थ लिहा.** १

कलम झालेले हात.

**II) आकलन कृती :**

**i) चौकटी पूर्ण करा.** १

१) प्रस्तुत कवितेचे कवी → ☐

२) झोतभट्टीत शेकणारे → ☐

**ii) खालील ओळीचा अर्थ लिहा.** १

भाकरीचा चंद्र शोधण्यात जिंदगी बरबाद झाली.

**III) काव्यसौंदर्य :**

**'दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दुःखात गेले' या ओळीतील विचारसौंदर्य स्पष्ट करा.** २

**IV) 'दुःख पेलावे' आणि 'पुन्हा जगावे' या वाक्याच्या मागील तुम्हाला जाणवलेला विचार तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.** २

SHIKSHA CLASSES, BHANDARA

**प्र. २आ ‘अंकीला मी दास तुझा’ व ‘योगी सर्वकाळ सुखदाता’ या दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील मुद्यांना अनुसरून कृती सोडवा.**

१) प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री १
२) कवितेचा विषय १
३) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे २

**इ) पुढील ओळींचे रसग्रहण करा.** ४

सवेंचि झेपावे पक्षिणी । पिली पडतांचि धरणीं ॥
भुकेलें वत्सरावे । धेनु हुंबरत धांवे ॥

**प्र. ३ पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** ६

१) **टिपा लिहा.** व्युत्पत्तीकोशाचे कार्य

२) ‘स्काय इज द लिमिट’ ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते ते ‘मोठे होत असलेल्या मुलांनो ......’ या पाठाच्या आधारे लिहा.

३) पणतीच्या उदाहरणातून कवितेत व्यक्त झालेला विचार स्पष्ट करा.

**प्र. ४ अ) व्याकरण घटकावर आधारित कृती.**

**१) समास** :

**तक्ता पूर्ण करा.** २

| **सामासिक शब्द** | **विग्रह** | **समास** |
|---|---|---|
| | प्रत्येक क्षणाला | |
| मित्रमैत्रिणी | | |

**२) वाक्यरूपांतरण :** २

१) आमची परिस्थिती प्रतिकूल होती. (नकारार्थी करा)
२) जगी सर्व सुखी असा कोण आहे? (विधानार्थी करा)

**३) वाक्यप्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.** २

१) अंगाचा तिळपापड होणे
२) मुठभर मास वाढणे.

**४) वाक्प्रचार - जोड्या लावा.** २

१) सामना करणे - लाज वाटणे
२) गोडी लावणे - कष्ट करणे
३) मेहनत करणे - आवड लावणे
४) चेहरा पडणे - मुकाबला करणे

SHIKSHA CLASSES, BHANDARA

**आ) भाषिक घटकावर आधारित कृती.**

**१) शब्दसंपत्ती :**

१) गटात न बसणारा शब्द लिहा. १

चौकोन, त्रिकोण, तीनचार, षटकोन

२) जोड शब्दांच्या जोड्या लावा. १

१) पाला ⟷ गाई ⟷ पाचोळा ⟷ वासरे

३) खालील शब्दाचे दोन समानार्थी शब्द लिहा. १

सूर्य - १) ............ २) ................

४) विरूध्दार्थी शब्द लिहा. १

१) गरीब × २) शूर ×

**५) लेखननियमानुसार लेखन :**

**१) अचूक शब्द ओळखा.** १

१) पारंपारीक, पारंपारिक, पारंपरिक, पारंपरीक

२) जीवन, जिवण, जीवण, जिवन

**२) खालील वाक्य लेखन नियमानुसार लिहा.** १

पाय वाळकया काटकिवर पडून 'कट' असा आवाज झाला.

**३) विरामचिन्हे :** १

पुढील वाक्यात योग्य ठिकाणी विरामचिन्हे द्या.


कल्पनांचा सुंदर आविष्कार कवितेत असतो हे बरोबर ना

**४) पारिभाषिक शब्द :** १

१) Government letter २) Plumber

**प्र. ५ : अ) पुढील कृती सोडवा :** **६**

**पत्रलेखन :** पुढील निवेदन वाचा आणि त्याखालील कृती सोडवा :




SHIKSHA CLASSES, BHANDARA

**किंवा**

**सारांश लेखन :**

विभाग १ गद्य विभागातील प्रश्न १. इ मधील उताऱ्याचा एक १/३ सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**आ) खालील कृती सोडवा. (दोन)** **१०**

**१) पुढील अपूर्ण कथा पूर्ण करा.**

पहाटेची वेळ होती. थंडगार वारा वाहत होता. गजर ऐकून अजय जागा झाला. तोंड धुवून अभ्यासाला बसला. मन लावून अभ्यास चालला होता. आईने अजयला दुधाचा कप आणून दिला. दूध पिऊन अजयचा अभ्यास पुन्हा सुरू झाला. अभ्यास करून अजय बाहेर जायला निघाला. जाता - जाता आईला म्हणाला, ''आई गं, जरा बागेत फिरून येतो,'' आई म्हणाली, ''थांब रे, हा लाडू खाऊन जा'' लाडू खात खात अजय बागेत गेला. बागेत जाताना त्याने खिशात गलोल टाकली.

अजयला आपल्याजवळ असलेल्या गलोलीच्या उपयोग करावासा वाटला. एक सुंदर पक्ष्याकडे अजयचे लक्ष गेले. चिमणीएवढा लहानसा पक्षी चिवचिवत होता. त्याची चोच पिवळ्या रंगाची होती व पंख निळ्या रंगाचे होते. त्या पक्ष्याकडे लक्ष जाताच अजयने गलोल काढली व त्या पक्ष्यावर नेम धरला.

**२) जाहिरात :**

**पुढील विषयावर आकर्षक जाहिरात तयार करा.**

दूरचित्रवाणी - बाजारात संदेशवाहिनीची जाहिरात तयार करा.

**३) बातमीलेखन : (५० ते ६० शब्द)**

**आधारवड वृद्धनिवास**
निर्मलनगर, पुणे
जागतिक वृद्ध दिनानिमित्त विशेष
सांस्कृतिक कार्यक्रम
गायन, वाद, कथाकथन
सादरकर्ते - रसिक मित्रमंडळ, पुणे
मोफत प्रवेश
सर्वांना सस्नेह निमंत्रण

१ ऑक्टों.

संध्याकाळी ५ ते ७

**— व्यवस्थापक**

वृद्ध दिनानिमित्त संपन्न झालेल्या वरील कार्यक्रमाची बातमी तयार करून लिहा.

**इ) लेखनकौशल्य :** **८**

**पुढील लेखनप्रकारापैकी कोणतीही एक कृती सोडवा.**

**१) मी गड बोलतोय**



सिंहगड प्रवेशद्वार
↓
इतिहासाचा साक्षीदार

शिवकालीन महत्त्व → चांगले पर्यटक

नंतर झालेली वाईट स्थिती → वाईट खोडकर पर्यटक

अपेक्षा → चांगले पर्यटक / वाईट खोडकर पर्यटक

## २) परीक्षा नसत्या तर ......!

परीक्षेच्या काळातील वातावरण → नसेल तर - मौज मस्ती - चिंतामुक्त - परीक्षा हव्यात - परीक्षांचे प्रकार →



## ३) वैचारिक :

यंत्र - आमचा मित्र का शत्रू ?

**मुददे :**

| | |
|---|---|
| यंत्राचा उपयोग अटळ | दोन्ही बाजूंनी भिन्न विचारसरणी |
| यंत्राचा शोध लागल्याने बेकारी वाढली | अपघातांचे खरे कारण |
| उत्पादन वाढले | यंत्र आमचा मित्रच |
| विकास होतो | नव्या युगात यंत्रशक्ती महत्वाची |
| क्षमता | उपयोग कसा करावा आपल्या हाती |
| चांगल्यासाठीच उपयोग, मित्र | नाशासाठी उपयोग, शत्रू |

* * *

SHIKSHA CLASSES BHANDARA


BECOME AN ACE IN JEE & NEET
SHIKSHA CLASSES
Believe & Achieve
JEE | NEET | Previse (8-10)
8625055707 | 8623085707
shikshaclasses.co.in
M-19, MHADA Colony, Khat Road, Bhandara
Learn with Jaiswal sir